# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १०७-२३** **दिनांक :- ०४/०४/२०२३**

## आशीर्वाद लॉजिंग आस्थापनेवर कारवाई करुन एका पिडीत महिलेची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांची कामगिरी.

दिनांक ०३/०४/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, नालासोपारा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अर्नाळा पोलीस ठाण्याचे हद्दीतील आशीर्वाद लॉज, कळंब, नालासोपारा पश्चिम या ठिकाणी लॉजचा चालक किरण नाईक हा पुरुष गिऱ्हाईकास महिलांना वेश्यागमनाकरीता पुरवितो व त्याबदल्यात गिऱ्हाईकांकडुन मोबदला स्विकारतो.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पो.नि. श्री. संतोष चौधरी यांनी मिळालेल्या माहितीची खातरजमा करुन कायदेशीर बाबींची पुर्तता केली व आशीर्वाद लॉज याठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच असे गेले असता लॉजचे चालक किरण नाईक याने वेश्यागमनासाठी मुलगी उपलब्ध करुन दिली व त्याबदल्यात मोबदला स्विकारत असताना पोलीस पथकाने छापा कारवाई करुन लॉजचा चालक किरण जगन्नाथ नाईक, रा. वाघोली बस स्टॉप जवळ, नालासोपारा यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस करता तो लॉज मालक आकाश भालचंद्र गोवारी व बंटी पुर्ण नाव माहित नाही, रा. कळंब यांच्या मदतीने सदरचा व्यवसाय करत असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी नामे किरण जगन्नाथ नाईक, पाहिजे आरोपीत नामे आकाश भालचंद्र गोवारी व बंटी यांच्याविरुध्द पो.हवा. महेंद्र शेट्टे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन अर्नाळा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं १२७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७० (१), ३४ सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये नोंद करण्यात आला. नमूद गुन्हयात लॉज चालक किरण जगन्नाथ नाईक यास अटक करण्यात आली असून एका पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपाराचे पो.नि. श्री. संतोष चौधरी, पो.उप.नि. निकम, पो.हवा. पवार, पद्मने, राउत, शेटये, किणी, म.पो.हवा. डोईफोडे, तिवले, चालक पो.हवा. पागी व रेस्क्यु फाउंडेशन पोईसर कांदीवलीचे सदस्य यांनी केली आहे.

-----oooo-----